www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 19 शनिवार दि. 27 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

# ...अखेर पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्या धरणे आंदोलनाला यश

## विमानतळाला दि.बा.पाटील यांच्या नावासाठी सिडको आग्रही असल्याचे आश्वासन

### आश्वासनानंतर धरणे आंदोलन स्थगित; दक्षता विभाग मुख्य अधिकारी सुरेश मेंगडेंचे विशेष सहकार्य

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील जमिनीवर उभारलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्यावतीने धरणे आंदोलनाचा इशारा दिला असता, सदर आंदोलन स्थगित करावे यासाठी बेलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार, सिडकोचे दक्षता मुख्य अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सिडकोचे विमानतळ प्राधिकरण सहव्यवस्थापक शंतनू गोयल यांच्याशी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घडवून आणत बैठकीचे आयोजन केले. यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सिडकोचे विमानतळ प्राधिकरण सहव्यवस्थापक शंतनू गोयल यांनी आयोजित बैठकीमध्ये सिडको प्रशासन हे स्व.लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावासाठी आग्रही असून आजपर्यंत विमानतळ नामकरणाचे जे




प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, ते फक्त आणि फक्त दिबांच्या नावाचेच असल्यामुळे स्थानिकांसह लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पत्रकार आंदोलनाच्या पावित्र्यात उतरल्यामुळे सिडको प्रशासन तथा विमानतळ प्राधिकरण देखील आपल्या भावना समजून घेत दिबांच्या नावासाठी प्रयत्नशील असल्याचे आयोजित बैठकीत आश्वासित करण्यात आले.

यावेळी सिडकोचे विमानतळ प्राधिकरण सहव्यवस्थापकशंतनू गोयल यांनी सांगितले की, पत्रकारांच्या भावना या राज्य शासनापर्यंतच नव्हे तर केंद्र शासनापर्यंत थेट पोहोचविणार असून, केंद्र शासन आपल्या भावनेची दखल घेईल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. सिडकोचे दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनीही सिडकोची भूमिका स्पष्ट करून विमानतळ प्राधिकरणाची माहिती दिली. इतक्या मोठ्या संख्येने पत्रकार प्रथमच एकत्र येऊन दि.बा. पाटील यांच्या नावासाठी आग्रही असल्याचे पाहून आपणही प्रभावित झालो असून, यापुढील भूमिका पत्रकारांनाही विश्वासात घेऊन स्पष्ट केली जाईल, असे आश्वासित केले.

प्रारंभी पत्रकारांच्यावतीने जेष्ठ पत्रकार विजय कडू, माधव पाटील, विवेक पाटील, सय्यद अकबर, निलेश सोनावणे, संजय कदम, केवल महाडिक, राज भंडारी, प्रकाश म्हात्रे, विशाल रावसाहेब सावंत, साहिल रेळेकर, रविंद्र गायकवाड, अनिल कुरघोडे, अनिल राय, शंकर वायदंडे, आप्पासाहेब मगर, संतोष वाव्हळ, भरतकुमार कांबळे, सुनील पाटील, शैलेश चव्हाण, साबीर शेख, दिपाली पारसकर, सनीप कलोते, गौरव जहागीरदार, चंद्रकांत शिर्के, असीम शेख, अण्णासाहेब आहेर, सुभाष वाघपंजे, सुधीर पाटील, तुलसीराम बोरीले, अक्षय कांबळे, जितेंद्र गावडे, नवी मुंबईतील पत्रकार दिनेश पाटील आदी उपस्थित एकूण ३५ पत्रकारांनी धरणे आंदोलनाबाबत आपली भूमिका विशद केली. सदर धरणे आंदोलनाबाबत पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बेलापूर सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार तसेच गोपनीय पोलीस अधिकारी चेतन अहिरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# वैतरणा रेल्वे स्थानकात अखेर सीसीटीव्ही कॅमेरे लागले.

**दैनिक युवक आधार**
**डहाणू:- (प्रमोद तरळ)**



पश्चिम रेल्वेच्या विरार नंतर वैतरणा ते डहाणू रोड या भागात सर्व रेल्वे स्थानकांमधे सीसीटीव्ही कॅमेरे अत्यंत गरजेचे असल्याचे तसेच महिला सुरक्षा आणि पोलिस तपास यंत्रणांसाठी देखील सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे अत्यंत गरजेचे असल्याची बाब डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेच्या वतीने प्रशासनापुढे वेळोवेळी मांडण्यात आली होती.

फक्त मांडली नाही तर ह्या भागातील अनेक स्थानकांमध्ये काही असे प्रकार, गुन्हे घडवून गेले ज्यामध्ये स्थानकात सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे असते तर सत्यता तपासण्यास अधिक मदत मिळाली असती जी या आधी मिळू शकली नाही.

त्यामुळे जेव्हा जेव्हा अशी परिस्थिती उद्भवली त्या त्या वेळेला पुन्हा त्या घटनेचा आधार घेऊन रेल्वे स्थानकांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे किती महत्वाचे आहेत हे रेल्वे प्रशासनाच्या लक्षात आणून दिले. शिवाय संबंधित लोकप्रतिनिधी ,मंत्री यांच्या सोबत विधानभवनापर्यंत बैठकी घेत थेट मुख्यमंत्र्यांकडे देखील याबाबत पत्रव्यवहार करून मागणी करण्यात आली होती

आणि अखेर ह्या मागणीला मान्यता देत निर्भया फंडातून रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही (CCTV )कॅमेरे बसवले जाणार असल्याचे आश्वासन त्या वेळी देण्यात आले . काही दिवसांनी डहाणू ते वैतरणा रेल्वे स्थानकात सीसीटीव्ही (CCTV ) कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया सुरू झाली .परंतु मधल्या काळात काही कारणास्तव ह्या कामाला विलंब झाला आणि पुन्हा ही काम जलद गतीने हाती घेण्यात आले.

त्यामुळे २०१६ पासून संस्थेच्या वतीने सातत्याने करत असलेल्या मागणीची अखेर पूर्तता झाली असून आज डहाणू ते वैतरणा इथल्या सर्व स्थानकात सीसीटीव्ही (CCTV ) कॅमेरे लागलेले पाहून समाधान व्यक्त होत आहे.

कारण रेल्वे स्थानकांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे लागल्या नंतर गुन्हेगारी प्रवृत्तीला मोठ्या प्रमाणावर आला बसणार आहे तर पोलिस यंत्रणांना तपास करण्यासाठी आणि रेल्वेला असंख्य गोष्टींची सत्यता तपासण्यासाठी यापुढे एक महत्वाचे साधन उपलब्ध झाले आहे.

या दृष्टीने संस्थेच्या वतीने करण्यात आलेली मागणी पूर्ण झाली असल्यामुळे रेल्वे प्रशासनाचे तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व लोकप्रतिधींचे आम्ही आभार मानत आहोत. आणि अशा करतो की प्रत्येक स्थानकात लावलेले सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे कायम सक्रिय राहतील जेणेकरून गुन्हेगारी प्रवृत्तीला आला बसेल ..

# आष्टी तालुक्यातील भूमिपुत्र पोलीस अधीक्षक बजरंग बनसोडे यांना रौप्यपदक प्रदान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

सध्या मुंबई येथे गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्तीवर असलेले आष्टी चे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना उत्कृष्ट कामगिरी बद्दल विशेष तपास यंत्रणाचे महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते रौप्य पदक गुरूवार दि.२५ रोजी प्रदान करण्यात आले.




१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त भारत सरकार गृह मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय तपास यंत्रणा यांचे महासंचालक यांचे कडून बजरंग नसोडे यांना रौप्य पदक जाहीर करण्यात आले होते. मुंबई येथे राष्ट्रीय तपास यंत्रणा अंतर्गत पोलीस अधीक्षक पदी कार्यरत असताना ागील वर्षी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल रौप्यपदक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. मागील तीन वर्षापासून बनसोडे हे नआयए मधे कार्यरत होते. त्या काळात त्यांनी अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस आणले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेत रौप्य पदक ऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# समाजाच्या आरक्षण रक्षणासाठी आदिवासी आक्रोश क्रांती महामोर्चा

## १० ऑक्टोबर रोजी महामोर्चा चे आयोजन

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे

सर्वप्रथम आदिवासींमध्ये घुसखोरी करणाऱ्या आणि नव्याने आदिवासी होऊ पाहणाऱ्या समाजाला कुठल्याही परिस्थितीत या जमातीला स्थान नाही असे सर्वानुमते ठरविण्यात आले. आधीच आदिवासी समाजामध्ये गैर आदिवासी नौक-या बळकावल्या आहे. आदिवासी समाज आता अन्याय सहन करणार नाही. अशा स्वरूपाच्या तीव्र भावना समाज बांधवांच्या होत्या.बंजारा समाजाच्या घुसखोरी निषेधार्थ महाराष्ट्र मोठे आंदोलन करण्याचा ठराव एकमताने घेण्यात आला. सरकार ने कोणत्याही जमातीला अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करू नये या मागणीसाठी येत्या १० ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य आदिवासी समाजाचा आक्रोश क्रांती महामोर्चाचे आयोजन करण्याचे आयोजन करण्यात आले. या सभेमध्ये सर्व समाजाच्या वतीने आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीचे गठन करण्यात आले.

आता खरी आदिवासीयत दाखवायची योग्य वेळ आली आहे. दिवसेंदिवस आपल्यावरचा अन्याय, अत्याचार हा वाढतच आहे. आधी धनगर, आज बंजारा आपल्या आरक्षणात हिस्सा मागत आहे आणि आपण आज गप्पच बसलो तर उद्या इतर कोणी येऊन आपल्या मानगुटीवर बसेल म्हणून आजच जागे व्हा ! चूप बसाल तर उद्या आपल्या मुलांना भीक मागण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गात आरक्षण मागणीच्या विरोधात व इतर काही महत्वाच्या मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या आदिवासी आकोश मोर्चात लाखोंच्या संख्येने आपल्या मुला-बाळांसह सामील व्हा !

**प्रमुख मागण्या :**

१) अनुसुचीत जमाती प्रवर्गामध्ये बंजारा व इतर कोणत्याही जातीचा समावेश करण्यात येऊ नये.
२) आदिवासी विकास विभागाचा निधी इतरत्र वळवू नये. वळविलेला निधी व्याजासहीत आम्हाला परत करण्यात यावा.
३) आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक भरती तात्काळ करण्यात यावे.
४) बोगस आदिवासींना देण्यात आलेले सेवा संरक्षण मागे घेऊन त्यांना बडतर्फ करण्यात यावे व त्या ठिकाणी तात्काळ खऱ्या आदिवासींची नोकर भरती करण्यात यावे.
५) १७ संवर्गातील पेसा अंतर्गत नोकर भरती कायम स्वरुपी नियुक्ती करण्यात यावी.

सर्वानुमते आदिवासी बचाव कृती समितीचे अध्यक्ष म्हणून राजूभाऊ चांदेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तसेच इतर ही पदावर पदाधिकाऱ्यांची निवड या सभेमधूनच करण्यात आली. यावेळी राजूभाऊ चांदेकर यांनी आदिवासी आक्रोश क्रांती महामोर्चा मध्ये जिल्ह्यातील सर्व आदिवासी जमातीतील बांधवांनी सहभागी व्हावे अशी आव्हान त्यांनी केले. आपल्या आरक्षणाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य असून ती सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले.







# मुंबई विद्यापीठाच्या 58 व्या युवक महोत्सवात;

## वीर वाजेकर महाविद्यालयास दोन सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय फुंडे उरण, च्या प्रथमेश सदानंद म्हात्रे एमएससी झूलॉजी च्या विद्यार्थ्याला पोस्टर मेकिंग आणि क्ले मॉडल मेकिंग या दोन्ही स्पर्धां मध्ये सुवर्णपदक पटकावले.या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष माजी आमदार बाळाराम पाटील सुधीर घरत, सौ. भावना घाणेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुजाता पाटील व सर्व प्राणीशास्त्र विभागातील सदस्य सर्व सेवक यांनी प्रथमेश म्हात्रे चे अभिनंदन केले.



# शेतकरी कर्जमाफी होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही...

**विष्णुपंत भुतेकर**
**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

रिसोड तालुक्यासह वाशिम जिल्ह्यात गेल्या मे महिन्यापासून सातत्याने अतिवृष्टीने शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झालेला आहे. शेतातील पेरलेली पिके सोयाबीन,तूर,हळद,उडीद,मूग, कापूस,भाजीपाला आणि फळ पिकांचे प्रचंड नुकसान झाले. आजपर्यंत सरकारकडून कुठल्याही प्रकारची मदत मिळाली नाही.सरकार सातत्याने घोषणा करीत आहे.परंतु शेतकऱ्यांना प्रत्यक्षात काहीही फायदा झाला नाही. त्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून काल रिसोड तहसील वर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.रिसोड तालुका ओला दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावा,शेतकऱ्यांचे नियमित व थकीत पीक कर्ज पूर्णपणे माफ करण्यात यावे,खरडून गेलेल्या जमिनीचे वेगळे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरीव मदत देण्यात यावी,शेतकऱ्यांचे वाहून गेलेले सिंचनाचे साहित्य त्याचा मोबदला देण्यात यावा,सिंचन करण्याकरता उभे केलेले सोलार व महावितरण ची यंत्रणा पूर्णपणे कोलमडून पडलेली आहे ते पूर्ववत उभी करण्यात यावी तसेच पीक नुसकाणीची मदत व क्षेत्र कमी केलेले सरकारने वाढवून दयावे.या सर्व शेतकरी हिताच्या मागण्यांसाठी भूमिपुत्र शेतकरी संघटने कडून संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वामध्ये भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्चामध्ये स्वयंस्फूर्तीने हजारो शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला . लोणी फाट्यावरील स्वर्गीय पुंडलिकरावजी गवळी यांना पुष्पगुच्छ अर्पण करून मोर्चाला सुरुवात करण्यात




आली. पुंडलिक चौक येथून सुरू झालेला मोर्चा भाजी मंडी मार्गे आंबेडकर चौकात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून तहसील कडे रवाना झाला.अपेक्षे पेक्षा जास्त गर्दी झाल्या मुळे शासकीय यंत्रनेची तारांबळ उडाली.रिसोड तहसील कार्यालयासमोर आल्या नंतर मोर्चाचे भव्य सभेत रूपांतर झाले.यावेळी शेतकऱ्यांनी 'एकच नारा सातबारा कोरा 'अशी प्रचंड घोषणाबाजी करून परिसर दानानून सोडला.सभेच्या सुरुवातीला भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संघटक तथा राज्य प्रवक्ते डॉ.जितेंद्र गवळी,नंदू महाराज बाजड,गणेश महाराज हुंबाड,भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार व शेतकरी नेते गजानन अमदाबादकर यांनी आपले विचार व्यक्त केले.यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी या भव्य मोर्चाला संबोधित करतांना,शेतकऱ्यांनी जो प्रचंड प्रतिसाद दिला त्याबद्दल शेतकऱ्यांचे आभार मानून पक्ष,जात,गट याच्या पलीकडे जाऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शेतकऱ्यांनी व शेतकरी युवकांनी गंभीरपणे पाहण्याची गरज असल्याचे सांगितले . रिसोड तालुक्यासह वाशिम जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे सोबतच राज्यातील संपूर्ण शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ झाले पाहिजे यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटना सातत्यपूर्ण संघर्ष करणार असल्याचे सांगितले. सरकार आणि लोकप्रतिनिधी यांना शेतकऱ्यांचा विसर पडला असून शेतकऱ्यांची लढाई भूमिपुत्र हातात घेणार असल्याचे ते या वेळी म्हणाले.सरकारचा प्रत्येक निर्णय शेतकऱ्यांवर अन्याय करणारा होत असुन सरकारने त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.यापुढे हे खपवून घेतले जाणार नसून शेतकरी प्रश्नासाठी लढा तीव्र करण्याचे आव्हान उपस्थित हजारो शेतकऱ्यांना विष्णुपंत भुतेकर यांनी केले.मोर्चासाठी रिसोड तालुक्यातून प्रत्येक गावातील शेतकरी,शेतमजूर हजारोच्या संख्येने उपस्थित होते. भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या रवींद्र चोपडे, श्रीरंग नागरे,विकास झुंगरे, महावीर ठाकूर,ज्ञानबा बाजड, गजानन जाधव,पुरुषोत्तम रंजवे, गजानन सदार,वैजनाथ रंजवे, शंकर सदार,विकास आवले, डॉ.अमर दहीहंडे,रवी जाधव, संतोष गव्हाणे,राजु डांगे, भीमराव खोडके,सीताराम लोखंडे,विनोद जाधव,बालाजी बोरकर,प्यारेलाल नागरे,देव इंगोले,संतोष सुर्वे,विष्णू सरकटे, संतोष मानवतकर,सितराम इंगोले,विलास अवचार,विनोद जाधव,राजु खडसे,सितराम इंगोले,विनोद मावळ,शंकर हुंबाड,शफी भाई,धीरज उगले, किसन पिटकर,पप्पु हेंद्रे,संतोष खोडके,भागवत मामा बोडखे, पंढरी नरवाडे,नितीन गाडे,पवन खोंडकर, जगणं गरकल, मुरलीधर जुनघरे,ज्ञानेश्वर वाळूकर,बाजीराव हरकळ,मेहमूद भाई,संतोष भुतेकर,किशोर लाड,राजु काकडे,जगन देशमुख, शेख रहमान,बळीराम बोडखे,सह भूमिपुत्र च्या अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जीवापाड मेहनत करून शेतकऱ्यांचा मोर्चा यशस्वी करून दाखवल्याबद्दल विष्णुपंत भुतेकर यांनी सर्व कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# चिमुकल्या गार्गीचा नवरात्री निमित्त फलकातून अनोखा संदेश

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**शिरवाडे वाकद** : नवरात्रौत्सव साजरा करण्याच्या पारंपरिक चौकटीतून बाहेर येत चांदोरी येथे स्त्री सन्मानाला अधोरेखित करणारी आगळीवेगळी जनजागृती करण्यात आली. देवी ही केवळ मंदिरातील मूर्ती किंवा श्रद्धेचा विषय नसून प्रत्येक स्त्री मध्ये वास करणारी अद्भुत शक्ती आहे, हा संदेश चिमुकल्या गार्गीने उपस्थितांना दिला.

चांदोरी ता.निफाड येथे सिद्धार्थ वनारसे, शिरीष गडाख, सौ.संगिता वनारसे, सौ.दिपाली गडाख यांच्या आयोजनातून दांडिया उत्सव जोरात सुरु आहे. या कार्यक्रमात शेकडो महिला पुरुष सहभागी होत असतात. या निमित्ताने सणाला नव्या विचारांची जोड देत चिमुकली गार्गी सागर आहेर हिने हातात संदेशफलक घेऊन उपस्थितांशी संवाद साधला. तिच्या छोट्याशा प्रयत्नाने मोठ्यांना विचार करायला भाग पाडले. सुप्रसिद्ध सुलेखनकार एकनाथ नाईकवाडी यांनी या उपक्रमासाठी खास घोषवाक्ये रचली होती. ही वाक्ये पाहून लोक थबकले, काहींनी मोबाईलमध्ये छायाचित्रे टिपली. संपूर्ण उपक्रमाला स्थानिक ग्रामस्थ, महिला मंडळे, युवक व सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी या संदेशांवर चर्चा करत, आजच्या समाजात मुलगी व स्त्रीला समान संधी, सुरक्षितता आणि सन्मान मिळण्याची गरज पुन्हा अधोरेखित केली. गार्गीच्या या उपक्रमातून नवरात्रोत्सवाचा खरा गाभा स्त्रीशक्तीचा गौरव व सन्मान समाजासमोर ठळकपणे मांडण्यात आला.

**प्रमुख घोषवाक्ये :-**

देवी दारात हवी आणि मुलगी घरात नको? हा विरोधाभास थांबवा.
देवी फुलांनी फुलते, स्त्री सन्मानाने.
देवी ही श्रद्धा आहे, स्त्री ही प्रेरणा आहे.
देवीला जागवा स्त्रीला उभारा.
घराघरात दुर्गा आहे तिला सुरक्षित ठेवा.




आपण देवीला नऊ दिवस फुलं वाहतो, आरती करतो, पण घरातल्या स्त्रीला सन्मान द्यायला विसरतो. सणाला नुसता उत्सवाचा रंग नको, विचारही हवा. आज गार्गीच्या या उपक्रमाने नवरात्रीला खरी दिशा मिळाली आहे.
**- दिपाली गडाख**

नवरात्र हा उत्सव केवळ देवीच्या पूजेत मर्यादित राहू नये. देवीची आराधना म्हणजे प्रत्येक स्त्रीला सन्मानाने वागवणे, तिच्या अस्तित्वाचा मान राखणे आणि तिला समान हक्क देणे, हाच खरी पूजा आहे.
**सिद्दार्थ वनाररसे**
**आयोजक**

# तरुणांनो नामस्मरण करा... हभप पूजाताई कुहिरे

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

आजच्या तरुण पिढीला जेवढी मोबाईलची गरज वाटते तेवढीच नामस्मरणाची अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन हभप पूजाताई कुहिरे यांनी केले आहे. त्या नवरात्र उत्सवानिमित्त डोल्हारा येथे राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेतील ह.भ.प. पूजाताई कुहिरे यांच्या सुमधुर वाणीतून हरी कीर्तन सोहळा गुरुवारी रात्री संपन्न झाला.परतूर येथील राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेच्या हभप. पूजाताई कुहिरे यांनी यावेळी



बोलताना तरुण पिढीला अत्यंत मोलाचा आणि विचार करायला लावणारा संदेश दिला,त्यांनी तरुण वयाचे महत्त्व सांगत, लोकांना संसाराच्या चिंतांमध्ये अधिक वेळ न घालवण्याचा आणि त्याऐवजी नामस्मरणावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला.त्या म्हणाल्या, "आजच्या तरुणाला विशेषतः नामस्मरणाची गरज आहे." परमार्थ प्राप्तीसाठी केवळ देवाला शरीराची इंद्रिये अर्पण करून चालणार नाही, तर सर्वात महत्त्वाचे आहे. ते मन अर्पण करणे. मन शुद्ध आणि एकाग्र असेल तरच खरा परमार्थ साधता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.कीर्तनप्रसंगी निरूपण करताना त्यांनी एक महत्त्वपूर्ण दृष्टांत दिला. त्या म्हणाल्या, "दगडाचे घाव सोसल्याशिवाय देवाला देवपण येत नाही." या उदाहरणातून त्यांनी सूचित केले की, आयुष्यात आलेल्या अडचणी, कष्ट आणि त्याग यातूनच मनुष्य आध्यात्मिक आणि नैतिक दृष्ट्या अधिक मजबूत आणिaउन्नत बनतो. जसे मूर्ती घडवण्यासाठी दगडाला छेनी-हातोडीचे घाव सोसावे लागतात, तसेच जीवनातही परमार्थ साधण्यासाठी त्याग आणि परिश्रमाची तयारी ठेवावी लागते. ह.भ.प. पूजाताई कुहिरे यांच्या या ओजस्वी आणि विचारांना नवी दिशा देणाऱ्या कीर्तनाने डोल्हारा येथील वातावरण भक्तीमय झाले होते. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांनी त्यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. आणि त्यांना श्रवणीय असा परमार्थिक अनुभव मिळाला त्यांच्या कीर्तनाला डोल्हारा येथील महिला पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहदा महावितरण कार्यालयावर धडकल्या महीला

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**कळंब** :-दिनांक २६ सप्टेंबर रोजी गट ग्रामपंचायत कोळेझरी तालुका कळंब अंतर्गत येत असलेल्या मार्कडा येथील महिला व ग्रामपंचायत उपसरपंच गौतम महादेव थुल व ग्रामपंचायत ग्राम विकास अधिकारी वैशाली थुल सहित अन्य महिला मौजे मार्कडा येथील जलस्वराज पाणीपुरवठा विहीरी वरती कनेक्शन गावफिडर वरून विद्युत कनेक्शन करून देण्यासाठी मोहदा विद्युत वितरण कंपनी चे अभियंता पोतदार साहेब यांना विद्युतपुरवठा मिळणे बाबत गट ग्रामपंचायत कोळेझरी कडून ठराव व निवेदन देण्यात आले,आजपर्यंत पाणीपुरवठा कनेक्शन हे ए-जी फिडर वरुन असल्यामुळे तेथील विद्युतपुरवठा सारखा बंद राहते त्यामुळे गावकऱ्यांना पाणी मिळत नाही तरी जलस्वराज पाणीपुरवठा विहिरी कारिता नवीन कनेक्शन गाव फिडर वरून विद्युत मिळणेबाबत २६ सप्टेंबर



रोजी ग्रामपंचायत अधिकारी व पदाधिकारी सोबत महिला भगिनी धडकल्या यावेळी अर्चना मेश्राम, लक्ष्मी चिंचाळकर,वैशाली चव्हाण, गीता आत्राम,अंजना हूड,सोनू चिंचाळकर,अनिता पेंदोर,वैशाली पेंदोर,बाली कडू,वनिता कुंभेकर,चंदा पेंदोर,पपीता चव्हाण,शालूबाई चिंचाळकर सहित अन्य महिला हजर होत्या.विद्युत वितरण कंपनी यांनी समाधान कारक उत्तर देत लवकरच गावफिटर कनेक्शन जोडणी करणार असल्याचे सांगितले.

# ' नशा मुक्त कळंबोली ' अभियानाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**उमाकांत पानसरे**

आज दिनांक 25 सप्टेंबर 2025 रोजी सी. डी.ए.आर. डी. आणि पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन आणि कळंबोली पोलीस स्टेशन यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक फार्मासिस्ट दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला साजरा करण्यात आला सध्या सध्या तरुण पिढी तरुण पिढी नशेच्या विळख्यात अडकत असताना तरुण पिढीला नशेपासून दूर ठेवण्यासाठी एक जनजागृती अभियान कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र काते तसेच औषध निरीक्षक श्री कारंडे सर कर्मचारी व अधिकाऱ्यांसहित एक जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. यावेळी जनजागृती करताना पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र काते यांनी फार्मासिस्ट सोबत 'नको नको नशा नको ' ' नही नही नशा नही ' अशा घोषणा देत नागरिकांसोबत रॅली सुधागड हायस्कूल पासून ते गुरुद्वारा येथील आई माता मंदिरापर्यंत घोषणा देऊन आई माता मंदिर येथे सर्व नागरिक आणि कळंबोली येथील प्रतिष्ठित नागरिक तसेच विसपुते कॉलेज येथील विद्यार्थी फार्मासिस्ट खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल न्यू पनवेल येथील व्यापारी फार्मासिस्ट मोठ्या संख्येने सामील झाले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कळंबोली श्री राजेंद्र काते





सरांनी सर्व नागरिक आणि फार्मासिस्ट बंधू-भगिनींना नशा मुक्त अभियानाबद्दल पोलिसांची भूमिका आणि नागरिकांबद्दलच्या भावना बोलून दाखवल्या. आरोग्य रक्षणाची शपथ घेतलेले फार्मासिस्ट जेव्हा नशामुक्तीची मशाल उंचावतात तेव्हा खऱ्या अर्थाने परिवर्तनाची सुरुवात होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगड जिल्हा केमिस्ट डिस्ट्रीब्युटर्स असोशियन चे पदाधिकारी
श्री.विवेक शिंदे श्री. संजय धनासुरे तसेच पनवेल तालुका अध्यक्ष श्री नितीन गावंड उरण तालुका अध्यक्ष श्री उमाकांत पानसरे यांचे मार्फत करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संतोष मोहिते श्री राजू निळकंठ श्री रघु पवार यांनी विशेष सहकार्य केले आजचा दिवस फक्त स्मरणाचाच नाही तर प्रेरणेत सुद्धा राहील कारण आरोग्य रक्षणाची आणि नशा मुक्तीची जनजागृती कळंबोलीतून सुरू झाली आहे अशीच काही नागरिकांची भावना दिसून येत होती.

# धामोळे वाडीत राबवले आरोग्य शिबीर

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

खारघरच्या धामोळे गावात परंपरा सामाजिक सेवा संस्थेने सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांना मदत केली. संस्थेच्या संचालिका चंचला बनकर यांनी जिल्हा परिषदेच्या सौजन्याने, येथे एक आरोग्य शिबिर आयोजित केले होते. जिथे मुलांचे आरोग्य तपासण्यात आले आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी मुलांचे डोळे देखील तपासले.

या ठिकाणी पालकांनीही आरोग्य शिबिरात भाग घेतला आणि स्वतःची तपासणी केली, डॉक्टरांनी सर्वांना निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी आणि सुरक्षा उपायांचा अवलंब करण्यावर भर दिला. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या सौजन्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते, यावेळी संस्थेच्या अध्यक्षा चंचला बनकर, अधिवक्ता वैशाली पंडित, अधिवक्ता किरण पंडित, नूतन गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या अंजनी सराफ, भाजपचे नेते ब्रिजेश पटेल, शाळेतील शिक्षक आणि इतर अनेकजण उपस्थित होते.




दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नवी मुंबई विमानतळा वरून पहिले विमान उडेल त्यावेळी

## दि.बा पाटील साहेबांचे नाव विमानतळाला लागलेले असेल : श्रीरंग बारणे

**दैनिक युवक आधार/**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

ज्यांच्या बलिदानामुळे भारतीय स्वतंत्र्याची पहाट उगवली. त्या हुतात्म्यांची चिरनेर ही ऐतिहासिक भूमी आहे. श्री महागणपतीचे तीर्थस्थळ आहे. इतिहासाची परंपरा या तालुक्याला लाभली आहे. हे या भूमीचे मोठे भाग्य आहे. अनेक हुतात्म्यांच्या बलिदानातून मिळविलेले स्वातंत्र्य चिरकाल टिकवणे ही आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे त्यामुळे या भूमीसाठी चांगले काम आपल्या हातून झालेच पाहिजे. असे प्रतिपादन मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी आज चिरनेर येथे जंगल सत्याग्रहाच्या 95 व्या अभिवादन सोहळ्या प्रसंगी चिरनेर येथील हुतात्मा स्मृतीस्तंभा जवळील आयोजित कार्यक्रमावेळी ते आपले विचार मांडताना केले. .



मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमा प्रसंगी व्यासपीठावर माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योगपती पी.पी. खारपाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, उद्योगपती राजाशेठ खारपाटील, शिंदे गटाचे अतुल भगत, सरपंच भास्कर मोकल ,उपसरपंच अरुण पाटील माजी उपसरपंच सचिन घबाडी, ग्रामपंचायतचे सदस्य प्रफुल्ल खारपाटील समीर डुंगीकर तसेच अन्य सदस्यांसह प्रशासकीय अधिकारी व हुतात्म्यांचे नातेवाईक, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

ते पुढे बोलताना श्रीरंग बारणे म्हणाले मी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी आलो आहे. या परिसरातील ज्या उणीवा भविष्यात विकासात्मक गोष्टीदृष्टीने घडवायच्या आहेत. त्या लोकप्रतिनिधींनी कडून अपेक्षित आहेत. आपण विकास कामे घेऊन पुढे जात आहोत. राज्य सरकार या राज्यामध्ये अतिशय चांगले प्रकारचे सकारात्मक काम करत आहे. साडेबारा टक्केचा प्रलंबित प्रश्न, त्याचा प्रस्ताव आराखडा आपण पाठविला आहे. तो निर्णयापर्यंत पोहोचलेला आहे. जे या मतदार संघातील नागरिकांना हवंय ते देण्याचे काम आपण करू. सातत्याने एक प्रश्न समोर येतो. तो म्हणजे लोकनेते दि.बा. पाटील यांचा नविमुंबई विमानतळाला नाव देण्याबाबतचा. विमानतळाला नाव देण्यावरून मी जाहीरपणे सांगतो की पहिले विमान उडेल त्यावेळी दि.बा पाटीलांचेच नाव त्या विमानतळाला लागलेले असेल. हा निर्णय शासकीय पातळीवर झालेला आहे. त्याच्यात कुठल्याही प्रकारचे राजकीय भाष्य नाही. शासकीय पातळीवर हा निर्णय सकारात्मक झालेला आहे. त्यामुळे जे विमानाचे उड्डाण होईल ते दि.बा. पाटलांचे नाव असूनच विमान उड्डाण होईल. असे सांगून, दि.बा. पाटलांचे नाव देण्याबाबत सरकारचे दुमत नाही. यावेळी जेएनपीटी कडून सर्वाधिक निधी मिळवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करू. असे सांगितले. ब्रिटिश सरकारने गोळीबार केलेल्या लढ्यात येथील शेतकऱ्यांना हौतात्मे पत्करावे लागले. या स्वातंत्र्य लढ्याला इतिहासात विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

याप्रसंगी हुतात्म्यांना पोलीस दलातर्फे बंदुकीच्या 21 फैरी झाडून शासकीय इतमात मानवंदना देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. या प्रसंगी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी आपल्या प्रश्नासाठी आपणच लढण्याची भूमिका ठेवली पाहिजे.असे सांगूनते पुढे म्हणाले आपले पूर्वज स्वातंत्र्यपूर्व काळात लढले त्यांच्या प्रेरणेतूनच या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला जागा मिळाली. त्यामुळे आपणही आपल्या न्याय हक्का साठी लढण्याची भूमिका ठेवली पाहिजे असेच सांगून, हा एक अतिशय चांगला सोहळा असल्याचे ते म्हणाले,या सोहळ्यासाठी मी रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना अरुण कारेकर यांच्या शिल्पकलेतून हुतात्म्यांची पूर्णा कृती चित्रे तयार करून घेतली. त्यासाठी हुतात्म्यांच्या वारसदारांकडून त्यांच्या चेहऱ्याच्या वर्णनाची माहिती घेतली. भावी पिढीला प्रेरणा देणारी हे शिल्प चित्रे आहेत. असे त्यांनी सांगितले.

यावेळी आपल्या प्रास्ताविकेतून चिरनेर गावचे सरपंच भास्कर मोकल यांनी चिरनेर गावाच्या पुराचा प्रश्न तसेच विरार अलिबाग कॅरिडोर एम एम आर डी ए या भेडसावणाऱ्या प्रश्नांची प्रास्ताविकेतून उकल केली. याप्रसंगी हुतात्म्यांच्या नातेवाईकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश पंडित व राजेंद्र भगत यांनी केले. यावेळी सरपंच भास्कर मोकल यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

# पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी आपले जीवन देशाची एकता व अखंडता साठी सदैव समर्पित केले

**( जिल्हा सचिव रुपेश मालुसरे )**
**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

अंत्योदयचे प्रणेते स्व. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंती निमित्त वांद्रे पूर्व विधानसभा वॉर्ड क्र.९४, भाजपा कार्यालय, एकताड़, साईबाबा रोड, खार (पूर्व) पंडितजींच्या प्रतिमेचे पुजन व हारफुले अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्या जीवनावरील कथन आत्मनिर्भर भारत, विकसित भारत, स्वदेशी आपले करा यादी विषयांवर चर्चा चा कार्यक्रम झाला.
या प्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उत्तर मध्य जिल्हा सचिव रुपेश मालुसरे म्हणाले की, ज्या काळात कोणतीही मिडीया नव्हती अश्या प्रतिकूल परिस्थितीत आपले मॅसेज व काम जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कठीण काम हि मंडळी करीत.



जेव्हा आपला देश उदयास आला तेव्हा त्यावेळी हिंदुत्ववादी विचारधारा रुजविण्याचे काम श्यामाप्रसाद मुखर्जी व पंडित उपाध्यक्ष यांनी केले. अंत्योदयची मुळ रजना पंडितजींनी केली अंत्योदय योजना म्हणजे समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत योजना व लाभ पोचविणे.
आता पंतप्रधान मोदीजी देशभर अंत्योदय योजनेतेच्या माध्यमातून सबसिडी गॅस, मुद्रा लोन, जनधन बँक खाते, मोफत रेशन, १२० युनिट विज मोफत, भाजीपाला साठी रुपये अकराशे आदी योजनेचा गरीबांना लाभ मिळवून देत आहे.
जिल्हा सदस्य लोक दवे म्हणाले की, पंडितजी यांचा १९१६ जन्म झाला ते सामान्य परिवारातील व्यक्ती होते. सन १९५१ साली जनसंघाची स्थापनानेचे संस्थापक सदस्य होते. पुढे ते १९६७ साली जनसंघाचे अध्यक्ष झाले होते. काही अल्पावधीतच त्याची हत्या झाली. पंडितजींनी देशासाठी खुप भरीव कामगिरी केली होती. या प्रसंगी जिल्हा व तालुकास्तरावरील
पंकज पांडे, संतोष राणे, हरेश मालुसरे, दिलीप पुजारी शैलेश उपाध्याय सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# अभिनव सामाजिक विकास मंडळ आयोजित नवरात्रौत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



गुळसुंदे गावातील अभिनव सामाजिक विकास मंडळ आयोजित शारदीय नवरात्रौत्सवाला यंदा भक्तगणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यंदा उत्सवाचे १६ वे वर्ष असून मंडळाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळ-संध्याकाळ आरती, तसेच सांस्कृतिक उपक्रमांमुळे वातावरणात उत्साहाचे व भक्तिरसाचे अनोखे मिश्रण अनुभवायला मिळत आहे.उत्सवाच्या काळात गरबा-दांडिया, विविध स्पर्धा, विशेष कार्यक्रम, तसेच मुलांसाठी उपक्रम अशा अनेक आकर्षणांची रेलचेल आहे. गावातील नागरिकांसह परिसरातील भाविकही या उत्सवात सहभागी होत असून गुळसुंदे गाव भक्तीमय वातावरणाने नटले आहे. मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते भाविकांसाठी उत्कृष्ट व्यवस्थापन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा उत्सव यशस्वी आणि उत्साहात साजरा करण्यासाठी महिला वर्ग परिश्रम घेत आहेत

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी शासकीय आयटीआय, घनसावंगी येथे अंत्योदय दिवस विविध उपक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**
**कार्यकारी संपादक : प्राचार्य जगन्नाथ रासवे**

घनसावंगी (दि. 25) : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय, महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार अंत्योदय दिवस डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी येथे उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य आर. व्ही.धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली रांगोळी, पोस्टर व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच 'एकात्म मानव दर्शन' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. चत्रभुज नाना गोडबोले यांनी




मार्गदर्शन करताना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व, त्यांची विचारसरणी व 'एकात्म मानव दर्शन' या मूलभूत तत्त्वज्ञानाची सविस्तर मांडणी केली.
प्रा. गोडबोले यांनी 1965 मध्ये मुंबई येथे पंडितजींनी दिलेल्या 'एकात्म मानव दर्शन' या व्याख्यानांच्या हीरक महोत्सव वर्षाचे औचित्य सांगितले. शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा एकात्म संबंध, धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आणि 'अंत्योदय म्हणजेच गरीब कल्याण' या संकल्पनेवर त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. तसेच "सबका साथ, सबका विकास" ही संकल्पना आज शासन विविध कल्याणकारी योजनांमधून राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले.
या प्रसंगी झालेल्या स्पर्धांमध्ये ऋषिकेश कुंभकर्ण (वेल्डर ट्रेड) याने रांगोळी स्पर्धेत, अल्ताफ शेख व पवन पगारे (कोपा ट्रेड) यांनी पोस्टर स्पर्धेत, तर राणी झाडे (ICTMS ट्रेड) हिने निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनिदेशक ए. सी. जगधने होते. व्यासपीठावर एच. डी. जाधव व अक्षय महल्ले यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. जगधने, सूत्रसंचालन श्रीमती मनीषा ताठे तर आभार प्रदर्शन श्री. अक्षय महल्ले यांनी केले.
, विजय मोरे, दत्तात्रय शेळके आदींसह संस्थेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुवर्ण भरारी संस्थेचा वतीने अभिनेता प्रमोद पंडीत यांना उत्कृष्ट अभिनेता पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**



पाथरे ता राहाता येथिल कलावंत व अभिनय आवड असणारे, व अनेक पुरस्कारने सन्मानीत अभिनेते प्रमोद पंडीत, यांना नुकताच सुवर्ण भरारी संस्थेचा वतीने उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार जाहीर झाला ,
सुवर्ण भरारी संस्थेचा संस्थापक अध्यक्षा सारीका ताई नागरे यांनी हा पुरस्कार जाहीर केला असुन, राष्ट्रीय प्रसिद्धीप्रमुख रवी माळवे ,अहिल्या नगर जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे ,राहता तालुका प्रसिद्धीप्रमुख शंकर सोनवणे ,सदस्य- श्री गोकुळ शेठ चिंतामणी, श्री पांडुरंग शेवंती ,मेजर सोमनाथ आहेर पा. श्रीपाद बोकंद , गुरुनाथ बोराडे, यांनी अभिनेते दिर्गदर्शक प्रमोद पंडित यांना फोन द्वारे शुभेच्छा दिल्या लोणी सोनगाव पाथरे पंचक्रोशीतून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे,

# म्हसळा तालुक्यात विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन व देवीदर्शन – मा.कॅबिनेट मंत्री अदिती ताई तटकरे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा, प्रतिनिधी –**
**शिरीष समेळ**

म्हसळा तालुक्यातील नागरिकांच्या दीर्घकालीन मागण्यांना प्रतिसाद देत तालुक्यातील विविध ठिकाणी विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन सोहळे उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या कॅबिनेट मंत्री मा. अदिती ताई तटकरे यांच्या उपस्थितीत आणि म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष समीरजी बनकर यांच्या समवेत हे कार्यक्रम पार पडले.

**नवरात्रोत्सव मंडपात देवीदर्शन व कार्यकर्त्यांशी संवाद**

या निमित्ताने मा. तटकरे यांनी म्हसळा शहरातील श्रीराम सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा मंडळ, कुंभार समाज नवरात्रोत्सव मंडळ, बेलदार समाज नवरात्रोत्सव मंडळ, आदिवासी वाडी नवरात्रोत्सव मंडळ यांच्या नवरात्रोत्सव मंडपात देवीचे दर्शन घेतले. स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांनी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.




**गावोगावी विकासकामांची गती**

यानंतर कॅबिनेट मंत्री मा. तटकरे यांनी कादळवाडा, निगडी, पाभरे, खारगाव बु., तोडसुरे जंगम वाडी, आगरवाडा, बनोटी, खरसई, मेदडी, वारळ, तुरुबाडी, रोहिणी, गोणघर, खारगाव खु. अशा तालुक्यातील विविध ठिकाणच्या नवरात्रोत्सव मंडळातील देवीच्या मंडपांना भेट दिली व गावागावातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन केले.
प्रत्येक ठिकाणी स्थानिक जनतेने मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक पद्धतीने औक्षण, पुष्पगुच्छ व जयघोष करत ग्रामस्थांनी मंत्री महोदयांचे स्वागत करून विकासकामांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**शासकीय योजना आणि महिला-बालकल्याणावर भर**

अदिती ताई तटकरे यांनी प्रत्येक ठिकाणी राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांची माहिती घेतली तसेच महिला व बालकल्याण क्षेत्रातील उपक्रमांबद्दल स्थानिक महिलांशी संवाद साधला. "तालुक्यात राबवल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा, रस्ते, शाळा, आरोग्य व इतर मूलभूत सुविधांच्या कामांना चालना देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू राहतील," असेही त्यांनी उपस्थितांना सांगितले.

**कार्यक्रमाचे नियोजन व स्थानिक नेतृत्वाचा सहभाग**

या भव्य दौऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी व भूमिपूजन समारंभाच्या नियोजन प्रक्रियेत म्हसळा राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष समीरजी बनकर, माजी सभापती महादेव पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य बबन मनवे, संदीप चाचले, राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते शाहीद उकये, नईम दळवी, आजिज बशारत, लहु म्हात्रे, निलेश मांदाडकर, वृषाली घोसाळकर, विद्यमान उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे, माजी नगराध्यक्षा जयश्री कापरे, माजी नगराध्यक्ष संजय कर्णिक, माजी उपनगराध्यक्ष संजय दिवेकर आदी मान्यवरांनी विशेष परिश्रम घेतले.

**उत्साह व भक्तिभावाचे वातावरण**

कार्यक्रमाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर नागरिक, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला बचतगट व युवक सहभागी झाले होते. सर्व ठिकाणी देवीदर्शनाबरोबरच ग्रामविकासाच्या संकल्पनांना चालना देणारा उत्साह, भक्तिभाव आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण अनुभवायला मिळाले.

# तळा तालुक्यातील रहाटाड आरोग्य उपकेंद्र चौकशीच्या फेऱ्यात. रायगड जिल्हाधिकारी यांनी दिले चौकशीचे आदेश.

## पत्रकार संजय रिकामे यांच्या पत्राची दखल.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी - नितीन लोखंडे.**

**तळा .** तळा तालुक्यातील रहाटाड आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम शासनाचे नियम धाब्यावर बसून करण्यात येत आहे. महिला व बाल विकास मंत्री अदिती ताई तटकरे यांनी तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी सदृढ करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सुख सोयी सुविधा मिळण्यासाठी तालुक्यात ठीक ठिकाणी आरोग्य केंद्राच्या इमारती उभारत आहेत. त्यापैकी रहाटाड येथे दीड कोटी रुपयांचे आरोग्य उपकेंद्र मंजूर करून त्यासाठी लागणारी जागा देखील हस्तांतर करुन उपलब्ध करण्यात आली. परंतु ठेकेदाराने शासनाची कुठलीही परवानगी न घेता हस्तांतरित केलेल्या जागेवर आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम न करता इतरत्र ठिकाणी केले आहे. या कामाच्या ठेकेदारास 45 लाख रुपये बिल अदा करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग माणगाव अभियंता यास कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित करून गुन्हा दाखल करण्यात यावा आणि ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे अशी मागणी राज्याच्या महिला बाल महिला व बाल विकास मंत्री अदिती ताई तटकरे, रायगडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे तळा प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री. संजय रिकामे यांनी 28 जुलै 2025 रोजी लेखी निवेदनाद्वारे केली होती. या तक्रारीची जिल्हाधिकारी यांनी गंभीर दखल घेत रायगड जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांना चौकशीचे 11 ऑगस्ट 2025 रोजी लेखी आदेश काढण्यात आले. त्यामुळे रायगड जिल्हा परिषद प्रशासन खडबडून जागे झाले आहे.



रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची चौकशी करून काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे त्यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांचे धाबे आणले आहेत. आता याबाबत शासन संबंधित अधिकारी, ठेकेदारांवर कारवाई करणार का.? याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महिलांच्या सामाजिक कौटुंबिक अडीअडचणी सोडविण्याकरिता गावोगावी जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

घोलपवाडी ता इंदापूर येथे महिलांची सामाजिक प्रश्न त्याचबरोबर कुटुंबातील अडचणी याकरिता वालचंद नगर पोलीस स्टेशन यांनी पुढाकार घेऊन या नवरात्रीमध्ये महिलांना विधी साक्षर करणे त्याचबरोबर महिलांच्या अत्याचाराला वाचा फोडणे याविषयीची जनजागृती या निमित्ताने केली रतिलाल चौधरी यांनी यावेळी उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी महिलांना आपल्या आजूबाजूला चौकसपणे लक्ष ठेवून काही आक्षेपार्य गोष्टी घडणार नाहीत याची त्यांनी दक्षता घ्यायला सांगितली व त्याचबरोबर चोर कोणत्या प्रकारे चोरी करतो व कोणत्या प्रकारे तो महिलांना फसवतो याची त्यांनी सर्वांना ओळख करून दिली त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचार याविषयी देखील



श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ यांनी नवरात्रीनिमित्त नारीशक्तीचा जागर व दुर्गा सप्तशतीच्या पाठाचे पाठाचे आयोजन श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट उद्धट यांच्या खंडोबा मंदिरामध्ये केले होते त्याचबरोबर देवीच्या पूजनानंतर वालचंद नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक त्यांनी आपली मत व्यक्त केले महिला दक्षता समितीचे अध्यक्ष प्रतीक्षा देशपांडे,वर्षा कदम,आशा सुकुंडे,छाया हारजीत,प्रियंका हारजीत,माधुरी यादव,वनिता थोरात,सोनाली घोलप,शितल घोलप, सुनिता देशपांडे,कविता हरजीत,नेहा पवार,मनीषा यादव,अशोक देशपांडे,रमण मोरे यावेळी उपस्थित होते

## पनवेलमध्ये भावानेच भावाचा खून – पोलीस बीट मार्शलची एका तासात शिताफीने कामगिर

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे**
**सह संपादक**

पनवेल शहरात सख्ख्या भावानेच भावाच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या बीट मार्शल पथकाने अवघ्या एका तासाच्या आत आरोपीस ताब्यात घेत गुन्हा उघडकीस आणला आहे.

घटनाक्रम

दि. २७ सप्टेंबर रोजी रात्री ८.३७ वाजता डायल ११२ द्वारे करंजाडे सेक्टर-५ पोलीस चौकीसमोरच्या रस्त्यावर एका ४५ वर्षीय पुरुषाचा दगडाने ठेचून खून झाल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर बिट मार्शल ०५ वरील अंमलदार घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी तत्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्यास याबाबत कळविले. यानंतर बिट मार्शल ०७ वरील पोहवा/२६६४ विलास बिराजी कारंडे व पोहवा/३९६१ राजेंद्र कृष्णा केणी यांनी घटनास्थळी चौकशी केली. त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला राहत्या घरातून अटक करण्यात आली.



खुनामागील कारण

अटक केलेल्या आरोपीचे नाव नागेश वाल्या काळे (वय ३२) असून त्याने आपल्या सख्ख्या भावाचा, दत्तु वाल्या काळे (वय ४५) याचा दगडाने ठेचून खून केला. प्राथमिक चौकशीत उघड झाले की, मयत दत्तु काळे याचे आरोपीच्या चुलत भावाच्या पत्नीशी अनैतिक संबंध होते. या कारणावरून संशयित भावाने रागाच्या भरात हा खून केला.

गुन्हा दाखल

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ७७०/२०२७ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (१) अंतर्गत नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून तपास पोनि/शाकीर पटेल (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. आरोपीस पोलीस कोठडी मिळविण्यासाठी आज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

पोलीस दलाचे कौतुकास्पद काम

ही कामगिरी पोलीस आयुक्त श्री. मिलींद भारंबे, सह पोलीस आयुक्त श्री. संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त श्री. दीपक साकोरे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०३ श्री. प्रशांत मोहिते व सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग श्री. भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## चिपळुणातील भाजपच्या मॅरेथॉन स्पर्धेच्या ब्रँड ॲम्बेसिडर गिनिज बुक सन्मानित डॉ.मनिषा वाघमारे

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी)**

: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण देशभरात सेवा पंधरवडा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानानिमित्ताने व तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. सेवा पंधरवडा अभियानांतर्गत संपूर्ण देशभरात नशामुक्ती भारत अभियानाचा प्रचार व प्रसार होण्याकरिता भारतीय जनता पार्टीच्या वतीने नमो युवा रन मॅरॅथॉन स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. त्याच अनुषंगाने आम्ही भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा वतीनेयेथे जिल्हास्तरीय नमो युवा रन मॅरॅथॉन स्पर्धेचे आयोजन करीत आहोत. या स्पर्धेसाठी ग्रीनिज बुकमध्ये सायकलिंगबाबत नाव नोंद झालेल्या डॉ. मनीषा वाघमारे यांना ब्रँड अम्बेसिडर म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांनी चिपळूणचा नावलौकिक वाढविला आहे. तसेच चीफ एअर मार्शल हेमंत भागवत, खासदार नारायण राणे, आयर्न मान डॉ.तेजांदन गणपते यांच्या उपस्थित या



स्पर्धेचा शुभारंभ व पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. या स्पर्धेची जोरदार तयारी चिपळूणमध्ये सुरू आहे. ही स्पर्धा पूर्णपणे मोफत आहे. सदर स्पर्धा दोन गटात होणार असून प्रथम गट हा वय वर्ष १४ ते १८ वर्ष असेल तर दुसरा गट हा वय वर्ष १८ पासून पुढे खुला असेल. ही नमो युवा रन मॅरॅथॉन स्पर्धा दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ६:३० वा. ते १०:३० वा. पर्यंत या वेळेत होणार आहे. सदर नमो युवा रन मॅरॅथॉन स्पर्धेचे अंतर ३ कि. मी. आणि ५ कि. मी अशा दोन टप्प्यांमध्ये असणार आहे. या स्पर्धेच्या शुभारंभ इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र येथून सुरू होऊन परत तिथे संपणार आहे. नमो युवा रन मॅरॅथॉन स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक काढणाऱ्या स्पर्धकांना विजेते घोषित केले जाईल. ही स्पर्धा शालेय गटामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनी या दोन विभागात होणार आहे. तर खुला गटात पुरुष आणि महिला या गटात होणार आहे. तसेच या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना मेडल व आकर्षक टी शर्ट देऊन सन्मानित केले जाईल . जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांनी ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रदेश युवा सचिव विक्रम जैन, भाजप युवा जिल्हा मोर्चा अध्यक्ष मंदार खंडकर. युवा मोर्चा चिपळूण तालुकाध्यक्ष महेश तटकरे, युवा मोर्चा सरचिटणीस मंदार कदम, संकेत चिले, शुभम पिसे, कुणाल अंबेकर यांनी केले आहे.

## आष्टी आयटीआय मध्ये पंडित दीनदयाळ जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**



श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. रोहित दुशी यांनी पंडित दीनदयाळ यांच्या कार्यावर प्रकाश टाकत अंत्योदय, देशहित व एकात्म मानव धर्म या संकल्पनांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अँड. प्रबोधन निकाळजे यांनी या कार्यक्रमाचे विविध पैलू सविस्तर समजावून सांगितले.


या प्रसंगी प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री.अक्षय शिरस्वाल व श्री. कैलास रेडेकर उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी आयटीआयचे प्राचार्य श्री. जी. बी. हडतगुणे होते.कार्यक्रमाचे नियोजन श्री डिडूळ सर,ए. वाय. शेख सर, दहिफळे सर, सानप सर, पवार सर, शिरसाठ सर, गीते सर, नागरगोजे मॅडम, एन. एस. साळवे व एस. आर. झाडे यांनी केले होते.या कार्यक्रमाला आयटीआयमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवदुर्गा सन्मान रायगड २०२५

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख /एम.डी.भोईर**

नारी म्हणजे शक्ती, नारी म्हणजे लक्ष्मी नारी म्हणजे आई, नारी म्हणजे मुलगी मग या चला सन्मान करूया,
चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे दर वर्षी दिले जाणारे
नवदुर्गा सन्मान रायगड हे पुरस्कार जिल्ह्यातील विविध श्रेत्रातील महिलांचे यथोचित मान सन्मान करणे हेच धैर्य मनात ठेऊन. चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड या वर्षी विविध तालुक्यातील नवदुर्गा चे सम्मान करणार आहेत .सदर सन्मान हे रत्नेश्वरी देवी मंदिर जसखार येथे शनिवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७-०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत.

या पुरस्कारासाठी पात्र महिला
१) महाड येथील योग शिक्षिका प्रा.सौ.अपूर्वा अनिल देसाई
३) बोकडवीरा तालुका उरण येथील वैद्यकीय क्षेत्रातील डॉ.सौ.वनिता श्रीकांत पाटील
३)अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ.प्रतीक्षा सचिन चव्हाण .
४) उरण केगाव येथील शालेय शिक्षिका सौ.शीतल शैलेश दर्णे
५) भानघर तालुका पनवेल येथील समाजसेविका सौ.करुणा ईश्वर ढोरे



६) कळंबूसरे तालुका उरण येथील गायिका कु. हदया सुदर्शन जाधव
७) आपले साम्राज्य या वृत्तपत्राच्या संपादिका पोलादपूर येथील सौ.सीमा प्रमोद मोरे
८) टाकीगाव तालुका उरण येथील महिला पोलिस हवालदार सौ.कनिष्का केतन नाईक
९) बोकडविरा तालुका उरण येथील अभिनेत्री सौ.निकिता सुरेश पाटील या नवदुर्गांना सन्मानित करण्यात येणार आहे.
तसेच या कार्यक्रम दरम्यान विशेष कार्य करणाऱ्याचे रायगड विशेष सन्मान करण्यात येणार आहेत ही माहिती संस्थे चे संस्थापक अध्यक्ष श्री विकास कडू यांनी दिली आहे.तसेच सदर कार्यक्रमांस जसखार ग्रामपंचायत चे सरपंच, उपसरपंच व अध्यक्ष आणी सेक्रेटरी उपस्थित राहणार आहेत आणी या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून संस्थेचे सल्लगार,आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक तथा उत्कर्ष समिती रायगड जिल्हाध्यक्ष श्री मिलिंद खारपाटील अभिनेते श्री डॉ राजू पाटोदकर आणि पोलादपूर नगरपंचायत चे नगरसेवक श्री शिवराज अनंत पार्टे , संस्थेचे मीडिया सल्लागार पत्रकार श्री विठ्ठल ममताबादे यांच्या प्रमुख उपस्थिती ने हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.
सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी चाईल्ड केअर सामाजिक संस्था चे सर्व सभासद जोमाने कामाला लागले आहेत.

## माणिकराव पालोदकर इंग्लिश स्कूल सह तालुक्यातील 123 शाळेत फुलपाखरांचा " होस्ट प्लॅन्ट " असलेल्या करंजाचे लावली 2 हजार रोपं

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** जगभरात सप्टेंबर महिना हा फुलपाखरांच्या संवर्धनासाठी कार्य करण्याचा महिना म्हणून मानला जातो. या अल्पजीवी प्रजातीच्या संवर्धनहेतू सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे डॉ. संतोष पाटील, सामाजिक वनीकरन विभाग, सिल्लोडचे वन परीक्षेत्र अधिकारी अनिल पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने, तालुक्यातील 123 शाळेत करंज या बहू उपयोगी वृक्षाचे 2 हजार रोपं या हंगामात लावण्यात आली आहेत. डॉ. संतोष पाटील यांनी अनेक दिवस या वृक्षावर संशोधन करून तब्बल 9 विविध प्रजातीच्या फुलपाखरांची मादी प्रजणन हेतू या पानांवर अधिवास करते हे शोधले आहे. मादी या पानांवर अंडी घालते व तीतून सुरवंट बाहेर येतात व हीच पाने खाऊन ती जीवनक्रम सुरु करतात. यास "होस्ट प्लॅन्ट"



*ट्री फॉर बी* :- करंजाचा अधिवास व प्रजनन हेतू उपयोग करणारी 9 विविध रंगी फुलपाखरे - कॉमन बँडेड अवल, व्हाईट बँडेड अवल, टच मी नॉट, अक्युट सनबीम, इंडियन सन बीम, डार्क सिरलियन,कॉमन सेलूलियन, पी ब्लू , चेष्टनट स्ट्रीक सेलर
**- डॉ. संतोष पाटील**
**पर्यावरण संवर्धक, सिल्लोड**

म्हटलं जातं. करंज फुलं विविध मधमाशा व कीटक, पक्षी यांनाही मकरंद पुरवतात. योगायोगाने सप्टेंबर महिन्यात आलेली नवरात्रीही सूरू आहे व नवरंगी योग साधत विवीध रंगी बेरंगी 9 प्रजातीच्या फुलपाखरे यांचा अधिवास असलेला " करंजाची " 9 रोपे रोपण करून आम्ही संस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. रुपाली पालोदकर, प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली महिला शिक्षिका व विद्यार्थीनीनी संगोपनाचे पालकत्व स्वीकारलं आहे अशी प्रतिक्रिया शाळेच्या मुख्याध्यापीका मनीषा पा.फुके यांनी दिली.

## घाटंजी तालुक्यातील कराटेपटूंची ऐतिहासिक कामगिरी

### मुंबईत झालेल्या पाचव्या इंटरनॅशनल कराटे चॅम्पियनशिपमध्ये १२ विद्यार्थ्यांचा यशाचा झेंडा

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**घाटंजी:-** पाचव्या इंटरनॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत घाटंजी तालुक्यातील विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक कामगिरी करून तालुक्याचा लौकिक वाढवला आहे. या भव्य स्पर्धेत जपान, टोकियो, मलेशिया, नेपाळ, इंडोनेशिया व भारत या सहा देशांतील खेळाडू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत घाटंजी तालुक्यातील कराटेपटूंनी तब्बल आठ सुवर्ण, तीन



रौप्य व एक कांस्य पदक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सुवर्णपदक विजेते – प्रतीक्षा कांबळे, श्रद्धा अक्कलवार, धनश्री चंद्रमे, समृद्धी राठोड, सोहम नडपेलवार, अनुज जगताप, क्षितिज गेडाम.रौप्यपदक विजेते – प्राची ठाकरे, आदित्य नागनूरवार, पूर्वी नागोसे. तर कांस्यपदक विजेता गिरीश राठोड ठरला.

या भव्य यशामागे प्रशिक्षक रामराव राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार घाटंजी पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड, पोलीस उपनिरीक्षक सुशील शर्मा, दिनेश जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे घाटंजी तालुक्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सोशल मिडियाचा अतिवापर मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ! :- डॉ.अशोक मते

## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)-**
जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा येथे जिल्हा रुग्णालय, बीड व अर्थशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "सोशल मीडियाचा वाढता वापर आणि तरुण-तरुणींचे मानसिक आरोग्य" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक जिल्हा रुग्णालय बीड येथील चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ.अशोक मते हे होते. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की आजच्या डिजिटल युगामध्ये तरुण-तरुणींचे दैनंदिन दिनक्रम सोशल मीडिया शिवाय जाणे अशक्य आहे. सुशील मीडियाचा वापर हा शिक्षण माहितीपर करमणूक आणि स्वतःला व्यक्त करण्यासाठी करणे आवश्यक असते परंतु आजची भरकटलेली तरुण तरुणी सोशल मीडियाचा अतिवापर करत असल्यामुळे त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडत चाललेले आहे. चिंता, नैराश्य, बेचैनी, एकाग्रतेचा अभाव, कामात




लक्ष न लागणे, अति विचार, डोळ्यांचे आजार, पाठीच्या स्नायूंचे आजार आणि व्यसनाधीनता इ. मानसिक व शारीरिक आजारांनी तरुणाई ग्रस्त होत चालली आहे. त्या मुळे आजच्या तरुणांनी मर्यादित प्रमाणात सोशल मीडियाचा वापर करून आपले जीवन सुंदररित्या जगणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये हे संस्काराचे विद्यापीठ आहे. तुम्ही योग्य संस्कार घ्या असे त्यांनी आवाहन केले. दुसऱ्या सत्रामध्ये मनोविकृती वर सामाजिक कार्यकर्ते श्री.अंबादास जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जाधव या वेळी बोलताना म्हणाले की, किशोरवयीन मुलामुलींमध्ये परीक्षा व करिअरच्या ताणामुळे आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. सोशल मीडियाच्या वापरामुळे एकलकोंडेपणा, मित्र आणि नातेवाईकांमध्ये मिसळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे वेगवेगळ्या मानसिक समस्या त्यांना भेडसावत आहेत. या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप प्र. प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी केला. या कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये आक्युएसी समन्वयक प्रा.विनोद किर्दक, श्रीमती प्रियंका भोंडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी नाटककार प्रा.बापू घोक्षे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी आयोजित केली. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ.वंदन जाधव, प्रा. डॉ.संदिपान किवणे, प्रा.डॉ.अशोक देवगुडे, प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान, प्रा.पापाजी चव्हाण आणि प्रा. डॉ.नारायण फून्ने यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालेगाव पंचायत समितीत नवी नियुक्ती : रमेश कंकाळ यांची गटविकास अधिकारी पदावर नेमणूक

## शिवसेने (उबाठा) च्या आंदोलनाला यश

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**
मालेगाव : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण आंदोलन आणि पाठपुराव्याला यश मिळाले असून, मालेगाव पंचायत समितीत नवी नियुक्ती झाली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांनी आदेश काढत रमेश कंकाळ यांची गटविकास अधिकारी म्हणून मालेगाव पंचायत समितीत नियुक्ती केली आहे. गेल्या काही दिवसांपासून मालेगाव तालुक्यात विविध प्रलंबित कामे, शासकीय योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी आणि अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे जनतेमध्ये नाराजीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षाने ठाम भूमिका घेत आंदोलने छेडली होती. अखेर या आंदोलनाचे यश दिसून आले असून पंचायत समितीस गटविकास अधिकारी मिळाल्याने विकासकामांना वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रमेश कंकाळ हे कार्यतत्पर, कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील शासकीय योजना, विकास उपक्रम आणि विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, अशी अशा स्थानिक ग्रामस्थ व जनप्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.




बॉक्स :
शिवसेना (उबाठा) पक्षाच्या आंदोलनामुळे ही नियुक्ती शक्य झाल्याने पक्ष कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.आता आगामी काळात जनतेसाठी प्रलंबित योजना तातडीने गतीमान होतील,असा विश्वास व्यक्त होत आहे.

# हिंदी पाखवड्यानिमित्त अलिबाग पोस्टात "ग्राहकाशी सुसंवाद !

## "ग्राहकाशी सुसंवाद" हे कार्यसंस्कृतीचे ब्रीदवाक्य व्हावे: डॉ.जयपालपाटील

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रदीप पाटील**
केंद्र सरकारच्या हिंदी पाखवड्यानिमित्त सुनील थळकर डाक आधीक्षक रायगड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड डाक विभागामार्फत विविध उपक्रम सुरू करण्यात आलेआहेत. या उपक्रमांतर्गत अलिबाग पोस्ट ऑफिसमध्ये “ग्राहकाशी सुसंवाद” या विषयावर एक प्रभावी आणि विचारप्रवर्तक वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत आपदा प्रबंधन विशेषज्ञ तथा ज्येष्ठ पत्रकार "रायगडभूषण"डॉ.जयपाल यांनी अत्यंत सहज आणि सोप्या भाषेत ग्रामीण भागातील ग्राहकांच्यामानसिकतेचे विश्लेषण करत, कर्मचारी वर्गाला संवादकौशल्याचे महत्त्व पटवून दिले. "पोस्ट खात्यात काम मिळणे ही केवळ नोकरी नसून समाजसेवेची सुवर्णसंधी आहे. आपले हसरे चेहरे आणि सौम्य वागणूक हीच आपली खरी ओळख असली पाहिजे", असा दिलखुलास सल्लाही त्यांनीयावेळी दिला,. या कार्यशाळेत ग्राहकांच्या मनातले प्रश्न, त्यांच्याशी योग्य संवाद कसा साधावा, रागावलेल्या ग्राहकाला कसे शांत करावे, हे सर्व मुद्दे उदाहरणासहित पटवून देताना . संवादातील नम्रता आणि सहृदयता ही काळाची गरज असल्याचा स्पष्ट संदेश त्यांनीयावेळी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक अधीक्षक राकेश मिश्रा, हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दर्शना सिंघासणे (पोस्टमास्टर, अलिबाग), प्रकाश पाटील (उपडाकपाल), प्रसाद पडके आकाउंट विभाग, मनोज अंबुरे, आणि देवेंद्र काते हे कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन मोनिका यांनी केले. या प्रेरणादायी उपक्रमातून डाक विभागाच्या ग्राहकाभिमुखतेचे दर्शन घडले असून, "ग्राहकाशी सुसंवाद" हे केवळ शिबिराचे नव्हे, तर कार्यसंस्कृतीचेही ब्रीदवाक्य व्हावे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळेस उपस्थितांना रायगड म्हणजे कधी केव्हाही पाउस आणी वीजा सुरु होते अश्या वेळी पोस्ट मन वितरणास जातात यासाठी भारत सरकारने वीज कोठे कोसळेल हे मोबाईल वर समजते दामिनी ॲप डाऊनलोड करून सुरक्षे साठी घेणे असे समारोपात डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी उध्दवराव सरोदे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुका पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी उध्दवराव सरोदे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा व कार्यकारिणीचा वैष्णवी स्टील ॲन्ड हार्डवेअर, होलसेल व रिटेलचे मालक, भाजपा युवा मोर्चाचे भावी जिल्हाध्यक्ष तथा नगर पंचायत अर्धापूरचे मा.नगरसेवक तुकाराम साखरे यांनी त्यांच्या वैष्णवी स्टील ॲन्ड हार्डवेअर देशमुख पेट्रोल पंप तामसा कॉर्नरच्या समोर अर्धापूर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे अर्धापूर तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे,बिबिशन कांबळे,ॲड. गौरव सरोदे आदिंचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.यावेळी नगर पंचायत अर्धापूरचे मा.नगरसेवक शिवराज जाधव,गणेश माने,परमेश्वर काळे,विठ्ठल साखरे आदि.



# पनवेल महानगरपालिकेच्या रस्ते डांबरीकरण कामातील अनियमिततेच्या तक्रारीः ठेकेदारांना दुरुस्तीचे आदेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
**पनवेल,** दि. 26 सप्टेंबर 2025: पनवेल महानगरपालिकेने खारघर, कामोठे आणि कळंबोली परिसरातील रस्ते डांबरीकरणासाठी पाच ठेकेदारांना एकूण 96 कोटींहून अधिक रकमेची कामे दिली आहेत. मात्र, या कामांच्या दर्जाबाबत आणि रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत पनवेल मनसे उपाध्यक्ष ,कर्मचारी-कामगार सेनेचे दिपक कोळवणकर यांनी ‘आपले सरकार’ पोर्टलवर तक्रार दाखल केली आहे. त्यांनी संबंधित ठेकेदारांवर कारवाईची मागणी केली आहे.

**ठेकेदार आणि त्यांना दिलेली कामे:**
1. **ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**: खारघर येथील रस्ते डांबरीकरणासाठी 30 कोटी 68 लाख 54 हजार 734 रुपये.
2. **पी. पी. खार पाटील कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**: खारघर येथील रस्ते डांबरीकरणासाठी 33 कोटी 33 लाख 65 हजार 614 रुपये.
3. **जे. एम. मात्रे इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड**: कामोठे येथील रस्ते डांबरीकरणासाठी 9 कोटी 18 लाख 90 हजार 308 रुपये.
4. **वैभव कन्स्ट्रक्शन**: कळंबोली येथील रस्ते डांबरीकरणासाठी 11 कोटी 68 लाख रुपये.
5. **पी. डी. इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**: रस्ते डांबरीकरणासाठी 11 कोटी 69 लाख 8 हजार 716 रुपये.

**तक्रारी आणि महानगरपालिकेचे उत्तर:**
दिपक कोळवणकर यांनी रस्त्यांच्या खराब दर्जामुळे आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तक्रार केली होती. यासंदर्भात पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी आशिष आरिकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सांगितले की, ज्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे कार्यादेश दिले होते, त्यापैकी काही रस्त्यांचे पुष्ट भाग नादुरुस्त झाले आहेत. याबाबत संबंधित ठेकेदारांना दुरुस्तीचे आदेश देण्यात आले आहेत. सध्या पावसाळ्यामुळे रस्ते वाहतुकीस योग्य ठेवण्यासाठी खड्डे तात्पुरत्या स्वरूपात सिमेंट काँक्रेट आणि जीएसबी (ग्रॅन्युलर सब-बेस) मटेरियल वापरून भरले जात आहेत. पावसाळा संपल्यानंतर हे तात्पुरते मटेरियल काढून रस्त्यांचे डांबरीकरण करून दुरुस्ती केली जाईल. विशेष म्हणजे, या दुरुस्तीसाठी ठेकेदारांना कोणतेही अतिरिक्त बिल अदा केले जाणार नाही, असे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

**नागरिकांचा संताप आणि अपेक्षा:**
रस्त्यांच्या खराब स्थितीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी आहे. खड्ड्यांमुळे वाहतूक अडथळे आणि अपघातांचा धोका वाढला आहे. नागरिकांनी ठेकेदारांच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, महानगरपालिकेने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. पावसाळा संपल्यानंतर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण होईल आणि दर्जेदार रस्ते मिळतील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**पुढील पावले:**
पनवेल महानगरपालिका आता पावसाळा संपल्यानंतर रस्ते दुरुस्तीच्या कामाला गती देणार आहे. ठेकेदारांना कामाचा दर्जा सुधारण्याचे आणि दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# माहिती अधिकार,पत्रकार संरक्षण समिती व पोलीस मित्र समिती यांच्याकडून सर्व शासकीय कार्यालयात माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे दिले निवेदन .

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी चिखली सिद्धार्थ धंदरे.**
चिखली (बुलढाणा)माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र यांच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व शासकीय,निम शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार दिन साजरा करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष श्री.महेशजी सारणीकर,महाराष्ट्र राज्य सचिव विनोद गायकवाड तसेच विदर्भ विभागीय महिला संघटक ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांच्या आदेशानुसार सर्व समित्या पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.




माहिती अधिकार हा नागरिक नागरिकांना हक्क प्रदान करणारा महत्त्वपूर्ण कायदा असून या कायद्याचा प्रचार व प्रसार करणे ही शासन व प्रशासनाची जबाबदारी आहे तसेच या कायद्याचे महत्त्व व उपयोगिता सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी सामान्य नागरिक यांना माहिती व्हावी तसेच शासनाच्या विविध योजना लोकाभिमुख व्हाव्यात शासकीय योजना व नागरिकांना व नागरिकांनी नागरिक यांच्यातील कारभार हितसंबंध पारदर्शक होण्यास माहिती अधिकार कायद्याचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर 28 सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो हे लक्षात येऊन महाराष्ट्र शासनाने 28 सप्टेंबर हा दिवस महाराष्ट्र शासन अधिनस्त प्रत्येक सरकारी कार्यालयात माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करावा असा शासन निर्णय 20 सप्टेंबर 2008 रोजी घेण्यात आलेला आहे.सदर निर्णयानुसार दरवर्षी सर्व शासकीय कार्यालय शाळा यामध्ये माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे शासनाचे आदेश आहेत या निर्णयानुसार माहिती अधिकार या विषयावर प्रश्नमंजुषा चर्चा सत्र व्याख्यान माला,विविध उपक्रम साजरे करून तसेच प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्धी देऊन नागरिकांना या माहिती अधिकार देणे उपक्रमात सहभागी करून प्रश्नमंजुषा व व्याख्यान आयोजित करावेत. यावर्षी 28 सप्टेंबर 2025 हा दिवस रविवार असल्यामुळे शासकीय नियमाप्रमाणे सदर माहिती अधिकार दिन हा 29 किंवा 30 सप्टेंबर रोजी साजरा करावा माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या तालुका चिखली समितीच्या वतीने मा.तहसीलदार तसेच मा. ठाणेदार साहेब चिखली तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती चिखली माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे बुलढाणा जिल्हा सचिव सिद्धार्थजी धंदरे माहिती अधिकार व पत्रकार राजेंद्रजी लहाने सुमित जाधव,गोकुळ शिंगणे,प्रवीणजी डोंगरदिवे आदी पदाधिकारी व सदस्य यावेळी उपस्थित होते.

# आष्टी आयटीआय मध्ये पंडित दीनदयाळ जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**
श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. रोहित दुशी यांनी पंडित दीनदयाळ यांच्या कार्यावर प्रकाश टाकत अंत्योदय, देशहित व एकात्म मानव धर्म या संकल्पनांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अँड. प्रबोधन निकाळजे यांनी या कार्यक्रमाचे विविध पैलू सविस्तर समजावून सांगितले.



या प्रसंगी प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री.अक्षय शिरस्वाल व श्री. कैलास रेडेकर उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी आयटीआयचे प्राचार्य श्री. जी. बी. हडतगुणे होते.कार्यक्रमाचे नियोजन श्री डिडूळ सर,ए. वाय. शेख सर, दहिफळे सर, सानप सर, पवार सर, शिरसाठ सर, गीते सर, नागरगोजे मॅडम, एन. एस. साळवे व एस. आर. झाडे यांनी केले होते.या कार्यक्रमाला आयटीआयमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा उत्तर मध्य जिल्ह्याच्या वतीने सेवा पंधरवडा 'विचारवंत (प्रबुद्ध) संवाद' मेळावा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी जी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा या उपक्रमांतर्गत कुर्ला विधानसभा मतदारसंघात वीर सॅनिटरीम, मंदाकिनी परिहार मार्ग, टिळक नगर स्टेशन येथे 'विचारवंत (प्रबुद्ध) संवाद' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मुंबई उपनगरचे पालकमंत्री अड. आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजातील उच्चशिक्षित घटक वकील, डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, शिक्षक, प्राध्यापक, कलावंत तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

या संवाद सत्रात प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र भाजपा प्रवक्ते ॲड.अनिकेत निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला तसेच समाजातील प्रबुद्ध वर्गाची जबाबदारी आणि योगदान यावर सखोल विचार मांडले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विरेंद्र म्हात्रे, मा. जिल्हाध्यक्ष सुशम सावंत, जिल्हा महामंत्री हरीश भांदिगे, मिलिंद शिंदे सह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेलचे प्रतिनिधित्व रिफ्लेक्शन थिएटर पनवेल करणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: दरवर्षीप्रमाणे यंदाही रिफ्लेक्शन थिएटर पनवेल ही नाट्यसंस्था पनवेल तालुक्यातून एकमेव प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्र राज्य शासन आयोजित हौशी नाट्य स्पर्धा २०२५ मध्ये सहभागी होत आहे. या स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाली असून सरावाला पनवेलमध्ये उत्साहात सुरुवात झाली आहे.

या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन संकेत गायकवाड करत आहेत. संस्थेचे अध्यक्ष व नाट्य व्यवस्थापक म्हणून मृण्मय काणे कार्यरत आहेत, तर प्रसिद्धी प्रमुख, सोशल मीडिया हेड तसेच फिल्म कॉर्डिनेटर म्हणून प्रसाद हनुमंते जबाबदारी पार पाडत आहेत.

नाटकाचा पहिला प्रयोग येत्या नोव्हेंबर महिन्यात ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगणार आहे.



## परतूरमध्ये सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप रुपालीताई सवने यांच्या किर्तनाचे आयोजन....

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ढोके )**



परतूर शहरातील आदर्श कॉलनी येथे दि 26 सप्टेंबर 2025 रोजी शुक्रवारी रात्री 08 वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार व समाजप्रबोधनकार, झी टॉकीज फेम हभप रुपालीताई रामेश्वर महाराज सवने यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक वैशाली दिंगबरराव वाघ यानी दिली आहे.नवरात्र उत्सव समितीच्या वतीने या भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हभप रुपालीताई सवने महाराज यांच्या प्रभावी वाणीतून समाजप्रबोधन आणि भक्तीरसाची अनुभूती घेण्याची सुवर्णसंधी परतूरकरांना मिळणार आहे,तरी शहरातील व तालुक्यातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या किर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक वैशाली दिंगबरराव वाघ व श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान नवरात्र महोत्सव कमिटी आदर्श कॉलनी परतूर यांनी केले आहे.

# तळा तालुक्यातील रहाटाड आरोग्य उपकेंद्र चौकशीच्या फेऱ्यात. रायगड जिल्हाधिकारी यांनी दिले चौकशीचे आदेश.

### पत्रकार संजय रिकामे यांच्या पत्राची दखल.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी - नितीन लोखंडे.**



**तळा .** तळा तालुक्यातील राहटाड आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम शासनाचे नियम धाब्यावर बसून करण्यात येत आहे. महिला व बाल विकास मंत्री अदिती ताई तटकरे यांनी तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी सदृढ करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सुख सोयी सुविधा मिळण्यासाठी तालुक्यात ठीक ठिकाणी आरोग्य केंद्राच्या इमारती उभारत आहेत. त्यापैकी रहाटाड येथे दीड कोटी रुपयांचे आरोग्य उपकेंद्र मंजूर करून त्यासाठी लागणारी जागा देखील हस्तांतर करुन उपलब्ध करण्यात आली. परंतु ठेकेदाराने शासनाची कुठलीही परवानगी न घेता हस्तांतरित केलेल्या जागेवर आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम न करता इतरत्र ठिकाणी केले आहे. या कामाच्या ठेकेदारास 45 लाख रुपये बिल अदा करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग माणगाव अभियंता यास कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित करून गुन्हा दाखल करण्यात यावा आणि ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे अशी मागणी राज्याच्या महिला बाल महिला व बाल विकास मंत्री अदिती ताई तटकरे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे तळा प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री. संजय रिकामे यांनी 28 जुलै 2025 रोजी लेखी निवेदनाद्वारे केली होती. या तक्रारीची जिल्हाधिकारी यांनी गंभीर दखल घेत रायगड जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांना चौकशीचे 11 ऑगस्ट 2025 रोजी लेखी आदेश काढण्यात आले. त्यामुळे रायगड जिल्हा परिषद प्रशासन खडबडून जागे झाले आहे आता याबाबत शासन प्रशासन संबंधित अधिकारी ठेकेदारांवर कारवाई करणार का.? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.




बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांकना प्रति हेक्टर ५०,०००/- रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी. अश्या प्रकारचे निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने उपविभागीय दंडाधिकारी पाटोदा यांना पाटोदा तालुक्यातील समस्त नागरिकां समवेत देण्यात आले. या वेळी कॉ.महादेव नागरगोजे, कॉ.भगवान जावळे, कॉ.बबन औटे, राजेंद्र जायभाय, चक्रपाणी जाधव, कॉ.महादेव पवळ, वसंत लोढे, आशोक जाधव, पांडुरंग दगडखैर सह आदी उपस्थित होते.

(छाया-दैनिक युवक आधार पाटोदा.)

## भाजी मार्केटमधील विक्रेता व कातकरी महिलांचा 'नवदुर्गा सन्मान'



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

– नवरात्रोत्सवानिमित्त गार्गीज ग्रुप तर्फे 'नवदुर्गा सन्मान' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. २५ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता पनवेल भाजी मार्केट येथे हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत भाजी विक्रेता महिला तसेच कातकरी समाजातील महिलांचा साडी व उपवासाचे पदार्थ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या जीवनातील कष्टमय संघर्षाला मानाचा मुजरा देण्याचा हेतू या उपक्रमामागे होता.

हा उपक्रम प्रेसिडेंट कविता ठाकूर यांच्या संकल्पनेतून साकार झाला. गार्गीज ग्रुपच्या सर्व सदस्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वेळी प्रेसिडेंट कविता ठाकूर, सेक्रेटरी शिल्पा चंदने, चीफ एडवायझर नेहा वेंगुर्लेकर, चीफ एडवायझर रसिका बोर्डस आणि फाउंडर रश्मी मोरे यांनी उपस्थित राहून महिलांना सन्मानित केले.

सन्मान मिळाल्यानंतर महिला विक्रेता व कातकरी भगिनींनी गार्गीज ग्रुपचे आभार मानले व नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या.

# शहरातील नागरी सुविधा करीता स्वराज्य पक्ष मैदानात.

### 5 ऑक्टोंबर नंतर कोणत्याही क्षणी गोपाल तायडे यांचे आमरण उपोषण .

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

शेगांव शहराची परिस्थिती अत्यंत विधारक स्वरूपाची झाली आहे.शहरातील नागरिकांना नगरपरिषदेच्या नाकर्ते पणामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. नागरी सुविधांचा मोठा अभाव जाणवतं आहे. नगर परिषद शेगांव स्वच्छ सर्वेक्षण अमरावती विभगवतून चागले गुण मिळून मानांकन मिळाले आहे. परंतू शहरातील परिस्थिती वेगळच चित्र दाखवीत आहे . नगरपरिषदेच्या मूलभूत सुभिधा नगारिकान पर्यंत पोहचत नाही ही मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. त्या मुळे शहरातील विधायक कामे पूर्ण होणे आवश्यक आहे.

1) शहरात स्वच्छतागृह मुतारी व्यवस्था.
2) शहारामधील घाण कचरा निवारण. नाली साफ सफाई.
3) रस्ते खड्डे मुक्त करावे.
4) स्वच्छ शुद्ध पिण्याच्या व्यवस्था .
5) शहरातील महापुरुषांच्या चौकाची तूटफुटीची दुरस्ती , तेल चत्राची रंग रगोटी. चौकाची सफाई करिता सफाई कामगार. विद्युत रोषणाई.
6) शहरात सांडपाण्याकरिता चेंबर करिता खोदलेल्या स्त्यांची दूरूस्ती
7)भटक्या जनावरांना गुरे, ढोरे, कुत्रे करिता आळा घालावा कोडवळा व्यवस्था करावी.
8) मातंगपुरी पुनर्वसित तसेच सुशिक्षित बेरोजगार व स्वावलंबी महिलांच्या मंदिर परिसरातील छोट्या दुकानदारांना करपावती आकारणी करू नये.,दुकानदारांना कायमची जागा मिळावी. शॉप अक्ट लायसन्स द्यावे. वारंवार अतिक्रमण करू नये.



9) शहरातील ना दुरुस्त कॅमेरे काढून नवीन सी. सी. टीव्ही. कॅमेरे लावावे .
10)शहरातील पथ दिवे सुरळीत करावे.विद्युत रोषणाई यावं व

अश्या अनेक समस्या शहरातील नगरिकांना भेडसावत आहे. आणि नगर परिषद मुंग गिळून गप्प आहे. त्या मुळे स्वराज्य पक्ष मैदानात उतरून स्वराज्य पक्षाचे नेते गोपाल तायडे नागरिकांच्या समस्या करिता दी.5 सप्टेंबर नंतर कोणत्याही क्षणी आमरण उपोषण करणार असून याची संपूर्ण जबाबदारी नागर परिषदेची राहणार. असे निवेदना द्वारे त्याच्याकडून कळविण्यात येत आहे.

## नशामुक्त कळंबोली जनजागृती अभियान"

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

जागतिक फार्मासिस्ट दिन च्या निमित्ताने २५ सप्टेंबर २०२५ रोजी कळंबोली केमिस्ट असोसिएशन, कळंबोली पोलीस स्टेशन आणि विसपुते फार्मसी कॉलेज, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने "नशामुक्त कळंबोली जनजागृती अभियान" राबवण्यात आले. या अभियानांतर्गत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी १० वाजता नवीन सुधागड स्कूल येथून सुरुवात होऊन रॅलीचा समारोप आई माता मंदिर, कळंबोली येथे करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे आणि अमली पदार्थांच्या वापराबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. सर्व विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रॅली यशस्वी केली. यानिमित्ताने आयोजकांनी समाजाला व्यसनमुक्त ठेवण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले. "अमली पदार्थांपासून दूर रहा, आयुष्य सुंदर करा, या घोषवाक्याद्वारे अभियानाचा सकारात्मक संदेश दिला गेला.




# सुवर्णा सार्वजनिक नवरात्रोत्सव, कोप्रोली–२०२५

### महिलांकरता विशेष उपक्रमांसह उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

रायगड जिल्हा, उरण तालुका – कोप्रोली गावातील सुवर्णा सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ म्हणजेच "कोप्रोलीची माय माऊली" यंदा २३ व्या वर्षात पदार्पण करत मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सव साजरा करीत आहे. २००३ साली स्थापन झालेल्या या मंडळाने तब्बल २३ वर्षे आपली संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकात्मता जपत नवरात्रोत्सवाची परंपरा कायम ठेवली आहे. यंदा माय माऊलीची प्राणप्रतिष्ठा सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी झाली असून गुरुवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी विसर्जन सोहळा संपन्न होईल. या दोन्ही दिवशी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा विशेष सहभाग. चूल–मूल करणाऱ्या महिलांना या उत्सवाच्या माध्यमातून प्रोत्साहन देत त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. महिलांसाठी आरतीचा मान, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ पैठणीचा, संगीत खुर्ची, प्रश्नमंजुषा असे उपक्रम राबवले जात आहेत. तर लहान मुलांकरिता व युवकांसाठी शैक्षणिक स्पर्धा, मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.



नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत सर्व मंडळ सदस्य, युवक आणि भक्त नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होत आहेत. या उत्सवाचे यशस्वी आयोजन व शिस्तबद्ध पार पडण्यासाठी देविचंद म्हात्रे, भार्गव म्हात्रे, राहुल म्हात्रे, रवि म्हात्रे, सचिन पाटील, दिपक पाटील, मिलींद म्हात्रे, प्रितम ठाकुर, संजू पाटील, मनोज म्हात्रे, हृदयनाथ पाटील, शशि पाटील, संतोष पाटील, प्रशांत म्हात्रे आणि राकेश पाटील हे मंडळ सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

एकंदरीत, कोप्रोलीची माय माऊलीचे आगमन जितक्या उत्साहाने केले जाते, तितक्याच उत्साहाने नऊ दिवस हा उत्सव खेळीमेळीच्या वातावरणात, सांस्कृतिक उपक्रमांनी आणि भक्तिभावाने साजरा केला जात आहे.

# नळाच्या पाण्यामध्ये आढळले नारुसदृश्य कृमी गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

### तुपटाकळी ग्रामपंचायत नळयोजना ठरली स्पेशल अपयशी

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

कित्येक महीण्यापासुन तुपटाकळी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहरीसह पाण्याच्या टाकीत ब्लिचिंग पावडरची मात्रा योग्य टाकत नसल्याने व जाग जागेवर पाईप लाईन फुटलेली आहे पावसाळ्यामध्ये सुद्धा महीन्यात दोन वेळा मोठ्या मुश्किलीने नळ येत आहे.ते ही दुषीत पाणी गावकऱ्यांना पाजले जात असुन . यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.दि.२६ सप्टेंबर रोजी तर नळाच्या पाण्यामध्ये नारुसदृश्य कृमी आढळल्याने खळबळ उडाली .पधरादीवसा नतर बाबुराव पाटील यांचे नळाचे पाणी भरत असताना नारुसदृश्य कृमी आढळून आल्याने नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून यामुळे दुषीत व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत आहे लेखी तक्रार देऊनही पाण्याचा पुरवठा व्यवस्थित झाला नाही सार्वजनिक आरोग्याचे कुणालाही सोयरसुतक नाही काय,असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहे पाईप लाईन लीकेज आहे या कडेही



दुर्लक्ष केले जात आहे पालकमंत्री यांचा मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे सरपंच असुन सुद्धा पीण्याच्या पाण्यासाठी जिल्हाधिकारी पर्यंत नागरिक गेले होते तरी परीस्थिती काही बदल नाही पावसाळात फक्त दोन वेळा नळ येत आहे बाबुराव पाटील यांच्या येथील नळाच्या पाण्यामध्ये नारुसदृश्य कृमी आढळल्याने गावकऱ्यांनी ग्रामपंचायत गाठले व निवेदन दिले योग्य न्याय नाही मिळाला तर पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्यासाठी आंदोलन छेडले जाईल अशी गावकऱ्यांनी बोलुन दाखवले यावेळी बालाजी ठाकरे, संतोष कदम, संतोष राठोड, संतोष आडे, सुनील राठोड, बाबुराव पाटील, कुणाल पाटील, केशव गायकवाड , ब्रह्मानंद आंबेकर,शिवजीत गरबळे, दीलीप चव्हाण इत्यादींच्या हजर होते .